भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BV 547441

- 3 FEB 2023

अनु. क्र. 183817 दि. ........ मु.शु. रक्कम: 500/

दस्ताचा प्रकार: हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का : होय / नाही

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव: साई आशा इन्फ्रा प्रोजेक्ट

पत्ता: शिवाजी नगर पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नाव: ........

हस्ते व्यक्तीचे नाव व पत्ता: आकाश सासवडे पुणे

सौ. सुचेता सुहास देशपांडे

परवाना क्र. २२०१११८

५९२/२,बुधवार पेठ, पुणे.२

FEB 2023

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला आहे त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

01 FEB 2023

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY ANAND HANUMANTRAO JAWALKAR PUNE DIST. REGD.NO.18403 Exp. Dt. 24/10/2023 GOVERNMENT OF INDIA

# **हमीपत्र**

मी, **मे. साई आशा इन्फ्रा एज सिटी तर्फे भागीदार श्री. आयुष सतिश अगरवाल**, राहणार: सिटी स्क्वेअर बिल्डिंग, शिवाजीनगर, पुणे ४११००५. सदरचे हमीपत्र लिहून देतो कि, मौजे: **कासारअंबोली**, तालुका: **मुळशी**, जिल्हा: **पुणे** येथील **ग. नं. ८५१ पै.**, क्षेत्र: **१६७५.०० चौ. मी.** या मिळकतीमध्ये **रहिवास रेखांकन** पद्धतीचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागा मालक म्हणून मी दाखल केला आहे.

१) तूर्त या जागेमध्ये पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडून पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला देण्यात आली असुन याला पर्याय म्हणून सदर जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची किंवा व्यवस्था करीत आहे व त्यासंबंधी आवश्यक त्या वरिष्ठ भू वैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना या कार्यालयामार्फत, तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे माझेवर बंधनकारक राहील.

२) सदर इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीचा रहिवास वापरासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने मी करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी या हमिपात्राद्वारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मार्फत कोणताही पाणी पुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी कोणत्याही कोर्टाकडे याबाबत दावा दाखल करणार नाही.

४) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणण व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल याची मी काळजी घेईन.

५) सदरची योजना संपूर्णरीत्या प्रवर्तक/विकसक/मालक या नात्याने मी अन्य कोणास भविष्यकाळात विकल्यास मालकास/ प्रवर्तक/विकसकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन.

६) हे हमीपत्र माझे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

वरील हमीपत्र मी राजीखुशीने दिनांक: / /२०२३ रोजी लिहून दिले असे.

ठिकाण: पुणे.

दिनांक: / /२०२३

हमीपत्र लिहून देणार

मे. साई आशा इन्फ्रा एज सिटी तर्फे भागीदार

श्री. आयुष सतिश अगरवाल

NOTARY ★ INDIA ★ ANAND HANUMANTRAO JAWALKAR PUNE DIST. REGD.NO.18403 EXP. DT 24/10/2023 GOVERNMENT OF INDIA

BEFORE ME

ANAND H. JAWALKAR
NOTARY GOVT. OF INDIA
PUNE DIST

NOTED & REGISTERED
AT.SR.NO. 477/2023

14 FEB 2023

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL